RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ८, अंक ६] गुरुवार, जानेवारी २०, २०२२/पौष ३०, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ७**

**प्राधिकृत प्रकाशन**

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**अधिसूचना**

क्रमांक मऔविम/आयआयए/A23669/२०२२.

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील अनुक्रमे कलम १४ (एक) आणि कलम १४(दोन) (ब) नुसार, सामान्यतः, महाराष्ट्र राज्यात उद्योगधंद्यांची त्वरीत व पद्धतशीर स्थापना करण्यास व त्यांची वाढ करण्यास तसेच त्यांचा विकास करण्यास प्रोत्साहन देणे व त्यासंबंधात मदत करणे, आणि राज्य शासनाने या प्रयोजनासाठी निवडलेल्या औद्योगिक क्षेत्रांचा विकास करणे आणि उपक्रमांची स्थापना होण्यासाठी अशी क्षेत्रे त्यांना उपलब्ध करून देणेसंदर्भात महामंडळाची कामे स्पष्ट करण्यात आलेली आहेत;

आणि, ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील कलम १५ (के) नुसार महामंडळाचे सर्वसाधारण अधिकारांतर्गत आपले कामकाज योग्यरीतीने पार पाडण्यास आणि या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यास त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा इतर गोष्टी व कामे करणे ;

आणि, ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे तरतुदी अंतर्गत राज्य शासनाने औद्योगिक क्षेत्र म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सद्याचे शेंद्रा पंचतारांकीत औद्योगिक क्षेत्र उक्त अधिनियमाचे हेतूस्तव यापूर्वी अधिसूचित केलेले आहे ;

ज्याअर्थी, शासनाचे उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाची अधिसूचना क्र. आय. आय. ए. पॉलिसी- २०१०/प्र.क्र.७६८/उद्योग-२, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ अन्वये महाराष्ट्राचे धोरण -२०१३ जाहीर करणेत आले, (यापुढे उक्त धोरण असे नमूद केले आहे.) सदरचे धोरणानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्वतःच्या जागेवर जी विशेष आर्थिक क्षेत्र असतील अशा विशेष आर्थिक क्षेत्रांची अधिसूचना रद्द झाल्यावर त्यांचा विकास महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावली नुसार करण्यात येईल ;

आणि, ज्याअर्थी, राज्य शासनाने दिनांक १३ ऑगस्ट २०१३ चे असाधारण **राजपत्राद्वारे**, महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अधिनियम, २०१३ नुसार, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मध्ये कलम ४३-१ बी अंतर्भूत करून त्याद्वारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास कोणतेही औद्योगिक क्षेत्र एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून अधिसूचनेद्वारे घोषित करणेचे अधिकरण प्रदान केले आहेत;

अणि, ज्याअर्थी, राज्य शासनाने आयडीसी २०१५/प्र.क्र.९३/उद्योग-१४, दिनांक २७ डिसेंबर २०१६ चे निर्णयानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे तरतुदी अंतर्गत राज्यशासनाने “औद्योगिक क्षेत्र” म्हणून अधिसूचित केलेले महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कोणत्याही औद्योगिक क्षेत्राला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे एकात्मिक औद्योगिक क्षेत्र (IIA) म्हणून अधिसूचित करता येईल व सदर IIA क्षेत्राला म.औ.वि. महामंडळ विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम (३) ११५ अन्वये काम करू शकेल ;

आणि, ज्याअर्थी, मे. इन्सपिरा इन्फ्रा (औरंगाबाद) लि. यांनी म.औ.वि महामंडळाच्या शेंद्रा पंचतारांकीत औद्योगिक क्षेत्र येथील प्लॉट नं. C-२१, C-२३, C-२३/१ आणि C-२३/२ एकूण ९३.८५ हे.आर. क्षेत्रास मऔवि अधिनियम, १९६१ चे कलम ४३-१ (ब) अन्वये IIA म्हणून घोषित करण्याची महामंडळास विनंती केली आहे;

आणि, ज्याअर्थी, दिनांक ७ फेब्रुवारी २०२० रोजी संपन्न झालेली १२२ व्या उच्चाधिकार समितीचे बैठकीत मे. इन्सपिरा इन्फ्रा (औरंगाबाद) लि. यांच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या शेंद्रा पंचतारांकीत औद्योगिक क्षेत्र येथील प्लॉट नं. C-२१, C-२३, C-२३/१ आणि C-२३/२ एकूण ९३.८५ हे.आर. क्षेत्रास एकात्मिक औद्योगक क्षेत्र (IIA) विकासाला सहमती दर्शविली आहे; म्हणून जाहीर करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यास उच्चाधिकार समितीने मान्यता दिली आहे.

त्याअर्थी, शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (सन २०१३ चा सुधारणा अधिनियम, १५) च्या कलम ४३ खंड (१ब) अन्वये महामंडळास प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून, निम्नस्वाक्षरीकार म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ याद्वारे महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ४३(१) (ब) अन्वये तसेच शासनाचे उक्त धोरणातील बाब क्र. ५ अन्वये, मला प्रदान करणेत आलेल्या शक्तीचा वापर करून शेंद्रा पंचतारांकीत औद्योगिक क्षेत्रातील खालीलप्रमाणे परिशिष्टात उल्लेखित क्षेत्र हे एकात्मिक औद्योगिक क्षेत्र –IIA, म्हणून घोषित करीत आहे.

**परिशिष्ट**

**(क्षेत्राचे वर्णन)**

| अ.क्र. (१) | औद्योगिक क्षेत्राचे नाव (२) | भुखंड क्रमांक (३) | सर्व्हे नंबर (४) | हिस्सा नंबर (५) | एकूण क्षेत्र (हेक्टर, आर) (६) |
|---|---|---|---|---|---|
| १. | शेंद्रा पंचतारांकीत औद्योगिक क्षेत्र | C-२१, C-२३, C-२३/१ आणि C-२३/२. | --- | --- | ९३.८५ हेक्टर, आर |
| | | | | एकूण | ९३.८५ हेक्टर, आर |

**चतु : सीमा–**

उत्तरेस किंवा उत्तरेकडील बाजूस : समृध्दी महामार्ग, वगळलेले क्षेत्र, भूखंड क्र. एएम-८

दक्षिणेस किंवा दक्षिणेकडील बाजूस : 20 मी. महामंडळाचा रस्ता, भूखंड क्र. एएम-३४ए एएल-६ आणि ६० मी. महामंडळाचा रस्ता.

पूर्वेस किंवा पूर्वेकडील बाजूस : भूखंड क्र. ओएस-४, एएम-८, सी-३६, ओएस-१९, एएल-3 आणि एएल-६

पश्चिमेस किंवा पश्चिमेकडील बाजूसः 20मी. महामंडळाचा रस्ता, वगळलेले क्षेत्र, ६६ मी. महामंडळाचा रस्ता, भूखंड क्र. एएम-३४, एएल-१८ आणि एएल-१९.

मुंबई,
दिनांक २० जानेवारी २०२२.

**डॉ. पी. अन्बलगन,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

**MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION**

(A government of Maharashtra Undertaking)

*NOTIFICATION*

No. MIDC/IIA/A23669 /2022

Whereas, the provisions mentioned in section 14(*i*) and 14(*ii*)(*b*) of the Maharashtra Industrial Development Act, 1961 respectively enables the Maharashtra Industrial Development Corporation to function as to generally to promote and assist in the rapid and orderly establishment , growth and development of industries in the State of Maharashtra, and to develop industrial areas selected by the State Government for the purpose and make them available for undertakings to establish themselves;

And Whereas, the provisions mentioned in section 15(*k*) of the Maharashtra Industrial Development Act, 1961 describes the general powers of the Maharashtra Industrial Development Corporation to do such other things and perform such acts as it may think necessary or expedient for the proper conduct of its functions, and the carrying into effect the purposes of this Act;

And Whereas, under the provisions of the Maharashtra Industrial Development Act, 1961 the State Government has already notified the land as Industrial Area known as Shendra 5-Star Industrial Area of the Maharashtra Industrial Development Corporation for the purpose of the said Act;

And Whereas, Maharashtra Logistic Park Policy, 2018, has been published by Government in Industries, Energy and Labour Department vide its Notification No.1916/C.R.221/Industry-2, dated 14th February 2018 (Herein referred as "the said Policy"); as per the Policy Lands under the SEZs that were notified on MIDC lands, upon de-notification of such SEZs, shall be developed as per the Development Control Regulations (DCR) of MIDC.

And Whereas, M/s. Inspira Infra (Aurangabad) Ltd. made an application requesting MIDC to notify their proposed project on Plot No. C-21, C-23, C-21/1 and C-23/2 total area admeasuring 93.85 Ha in MIDC's Shendra 5-Star Industrial Area as an IIA;

And Whereas, the High Power Committee in its 122nd meeting held on 7th February 2021 has approved the proposal of an 'Integrated Industrial Area' proposed to be developed by M/s. Inspira Infra (Aurangabad) Ltd. on Plot no. C-21, C-23, C-21/1 and C-23/2 total area admeasuring 93.85 Ha in MIDC's Shendra 5-Star Industrial Area.

Now, therefore, in exercise of powers conferred under clause (1B) of section 43 of the Maharashtra Industrial Development Act, 1961 (Mah.XV of 2013), the undersigned as Chief Executive Officer of Maharashtra Industrial Development Corporation, hereby notify the following area of Shendra 5-Star Industrial Area as Integrated Industrial Area (IIA) as per schedule and boundaries hereunder specified;

**SCHEDULE**

**(Description of area)**

| Sr.No. | Name of Industrial Area | Plot No. | Survey No. | Hissa No. | Area in H.A |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Shendra 5-Star Industrial Area | C-21,C-23, C-21/1 and C-23/2 | --- | ----- | 93.85 Ha |
| | | | | **Total** | **93.85 Ha** |

**Boundaries:-**

| | |
|---|---|
| *On or toward the North:* | Samruddhi Expressway, Released land, Plot no. AM-8 |
| *On or toward the South:* | MIDC 20 m wide road, AM-34, AL-6 and 60 m wide MIDC Road |
| *On or toward the East:* | OS-4, AM-8, C-36,OS-19, AL-3 and AL-6 |
| *On or toward the West:* | 20 m wide MIDC road, Released land, 66 m wide MIDC road, AM-34 and AL-18, AL-19 |

Mumbai,

dated 20th January 2022.

Dr. P. Anbalagan

Chief Executive Officer
Maharashtra Industrial Development Corporation

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.